**शेतकरी जनता अपघात विमा योजना**
**मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक शेअवि २००९/प्र.क्र.२६८/११-अे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ०४ डिसेंबर, २००९

**वाचा :-** १) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, एनएआयएस १२०४/ प्र.क्र.१६६/११अे, दिनांक १९ ऑगस्ट, २००४.
२) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, एनएआयएस १२०४/ प्र.क्र.१६६/११अे, दिनांक ५ जानेवारी, २००५.
३) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, एनएआयएस १२०४/ प्र.क्र.१६६/११अे, दिनांक ३१ मार्च, २००५.
४) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, पीएआयएस १२०७/ प्र.क्र.२६६/११अे, दिनांक १० ऑगस्ट, २००७.
५) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, पीएआयएस १२०७/ प्र.क्र.२६६/११अे, दिनांक २४ ऑगस्ट, २००७.
६) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शेअवि २००९/ प्र.क्र.२६८/११अे, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.
७) प्रधान सचिव (कृषि) यांचे पत्र क्रमांक शेअवि २००९/प्र.क्र.२६८/११अे, दि.३० सप्टेंबर,२००९

**प्रस्तावना :-**

शेती व्यवसाय करतांना व नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात उदा. रस्त्यावरील अपघात, वीज पडणे, विजेचा शॉक बसणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश व वाहन अपघात तसेच अन्य कोणतेही अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होवून अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता कोणतीही स्वतंत्र विमा योजना कार्यान्वित नव्हती. त्यामुळे शासनाने उपरोक्त क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये राज्यामध्ये **शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना** कार्यान्वित केलेली होती. सदर योजनेची कार्यपद्धती, अटी व शर्ती यामध्ये बदल न करता सदर योजनेचे नाव बदलून सन २००९-१० पासून **शेतकरी जनता अपघात विमा योजना** असे नामाभिधान करण्यास व सदर योजना सन २००९-१० मध्ये चालू ठेवण्यास उपरोक्त क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त क्र. ७ येथील पत्रान्वये या योजनेच्या अंमलबजावणीसंबंधीची कार्यपध्दती व नियुक्त यंत्रणेची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या संदर्भातील मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्याऐवजी सदर शासन निर्णयान्वये या योजनेसंबंधीच्या मार्गदर्शक सूचना विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**कृ.मा.प.**

**शासन निर्णय :-**

**शेतकरी जनता अपघात विमा योजने** संबंधीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

१) राज्यातील महसूल विभागातील ७/१२ नोंदीप्रमाणे १० ते ७५ वयोगटातील खातेदार शेतकरी यांचेवतीने त्यांच्या व्यक्तिगत अपघात व अपंगत्व यासाठी शासन प्रस्तुत निर्णयान्वये विमा पॉलिसी उतरवित आहे.

२) **सदर योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत,** सदर शासन निर्णयातील अटी, शर्ती व मान्यतेनुसार, शासनाचेवतीने आयुक्त (कृषि) यांनी शासन नियुक्त विमा कंपनी/कंपन्या आणि विमा सल्लागार कंपनी यांचेशी त्रिपक्षीय पॉलिसी करार करावा व सदर योजना अंमलात आणावी. विमा कंपनीने/कंपन्यांनी पॉलिसी करारातील तरतुदी, अटी व शर्ती आणि सदर शासन निर्णयातील विहित मार्गदर्शक सूचनांनुसार विमा दावे मंजूर करावेत.

३) शासन या योजनेंतर्गत विमा हप्त्याची (प्रिमियमची) रक्कम शेतक-यांच्यावतीने विमा कंपनीस अदा करणार असल्यामुळे शेतक-यांनी किंवा अन्य कोणत्याही संस्थेने या योजनेंतर्गत स्वतंत्ररित्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची गरज नाही.

४) यापूर्वी शेतक-यांनी अथवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध राहणार नाही. या योजनेंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

५) योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसाच्या २४ तासांसाठी ही विमा योजना लागू राहील. या कालावधीत शेतक-याला केव्हाही अपघात झाला तरी तो या विमा योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहील.

६) योजनेच्या कालावधीत दर तीन महिन्यांनी आयुक्त (कृषि) यांनी योजनेच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. सदर आढावा घेताना विमा कंपनीकडे दाखल झालेले दावे, त्यापैकी निकालात काढलेले दावे, नाकारलेले दावे, दावे प्रलंबित राहण्याची कारणे, प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी संबंधित विमा कंपनीने केलेले प्रयत्न, त्यांच्या कार्यालयाकडून शेतक-यांना मिळणारा प्रतिसाद, योजनेच्या प्रसिध्दीसाठी तसेच दावे निकाली काढण्यासाठी आखलेली मोहिम अथवा विशेष प्रयत्न इत्यादी गोष्टी विचारात घ्याव्यात व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. त्यांचा अहवाल विचारात घेऊन पुढील वर्षासाठी संबंधित विमा कंपनीची नियुक्ती पुढे चालू ठेवावयाची किंवा कसे अथवा अन्य कंपनीची नियुक्त करावयाची किंवा कसे याचे अधिकार सर्वस्वी शासनास राहतील.

७) योजना सुरु असलेल्या कालावधीसाठी विमा हप्ता देण्याची जबाबदारी शासनाची असेल व देय विमा दावे अदा करण्याची जबाबदारी विमा कंपनीची राहील. मात्र विमा कंपनीचे काम समाधानकारक नसल्यास, त्यांना

एक महिन्याची नोटीस देवून नियुक्ती रद्द करण्याची व त्यापुढील विमा कालावधीची विमा हप्त्याची रक्कम परत घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

८) शासन, विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनी/कंपन्या यांचेमधील त्रिपक्षीय करारामध्ये अथवा विमा पॉलिसीमध्ये काहीही नमूद केलेले असले तरी सदर शासन निर्णयातील अटी, शर्ती व मार्गदर्शक सूचना विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनी/कंपन्यांना बंधनकारक असतील.

९) सदर योजनेंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्याच्या कुटुंबियांस प्रकरणपरत्वे प्रपत्र-अ प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील.

१०) शासन नियुक्त विमा सल्लागार कंपनीने शासनास रुपये १५ लाखाची बँक गॅरंटी देणे अनिवार्य राहील.

११) या शासन निर्णयान्वये विहित केलेली प्रपत्रे/कागदपत्रे वगळता अन्य कोणतीही कागदपत्रे शेतक-यांनी वेगळ्याने सादर करण्याची आवश्यकता नाही किंवा या योजनेंतर्गत लाभासाठी विमा कंपनीकडे स्वतंत्रपणे अर्ज/कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अपवादात्मक परिस्थितीमध्ये, विमा प्रस्तावासोबत कांही कागदपत्रे सादर करावयाची राहिल्यास, पर्यायी कागदपत्रे/चौकशीच्या आधारे प्रस्तावावर निर्णय घेण्यांत यावा. यासाठी आवश्यकता वाटल्यास शासनाच्यावतीने आयुक्त (कृषि), विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनी/कंपन्या यांनी संयुक्तपणे निर्णय घ्यावा.

१२) पॉलिसी सुरु झालेल्या कालावधीत शेतक-याचा अपघात झाल्यास, सदर विमा योजनेंतर्गत त्यास अथवा त्याच्या कुटुंबियांस द्यावयाची रक्कम ही कागदपत्रासह विमा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २ महिन्यांच्या कालावधीत अदा करणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.

१३) **योजनेचे स्वरुप, लाभ व पात्रता दर्शविणारी विवरणपत्रे**

| | |
|---|---|
| १) विमा योजनेंतर्गत मिळणारे लाभ | प्रपत्र-अ |
| २) लाभार्थी पात्रतेच्या अटी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे | प्रपत्र-ब |
| ३) विमा संरक्षणामध्ये समाविष्ट नसणा-या बाबी | प्रपत्र-क |
| ४) पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | प्रपत्र-ड |

१४) या विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत विमा कंपनी, लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणा यामध्ये वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत समाधानकारक तोडगा काढण्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे जिल्हा नियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समिती त्याबाबतचा निर्णय घेईल.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) | सदस्य |

**कृ.मा.प.**

निवासी उपजिल्हाधिकारी सदस्य

विमा सल्लागार कंपनी - विभाग प्रमुख सदस्य

संबंधित विमा कंपनीचे अधिकारी सदस्य

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सदस्य-सचिव

वरील समितीची दरमहा बैठक घ्यावी व त्यामध्ये जिल्ह्यातील प्रकरणांचा आढावा घ्यावा. प्रलंबित/अनिर्णीत/विवादास्पद प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात यावा. समितीचे निर्णयानुसार अंमलबजावणी करणे संबधित विमा कंपनीस बंधनकारक राहील.

१५) संबधित विमा कंपनी/कंपन्या, विमा सल्लागार कंपनी व शासन यांनी सदर योजनेस स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीव्दारे पुरेशी प्रसिध्दी द्यावी.

१६) सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अथवा दावे अंतिम करण्यामध्ये काही शंका/अडचणी असतील तर त्या दूर करणे तसेच योजनेची अंमलबजावणी करणा-या यंत्रणांना, संबधितांना योजना समजावून सांगणे यासाठी विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनीने पुढाकार घेऊन संबधित जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठकांचे आयोजन करावे.

१७) आयुक्त (कृषि) यांनी विमा सल्लागार कंपनीच्या मदतीने सदर योजनेचे संनियंत्रण करावयाचे असून आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बैठका आयोजित करुन, आढावा घेऊन योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल यादृष्टिने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

१८) सदर योजनेत कोणतेही बदल/सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील. शासन यासाठी विमा कंपनीशी आवश्यकतेप्रमाणे सल्लामसलत करील.

१९) सदर योजनेसंदर्भात जनतेकडून, लोकप्रतिनिधींकडून विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत असतात. त्यासंदर्भात शासनास/कृषि आयुक्तालयास कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता भासल्यास सदर माहिती विमा कंपनी, विमा सल्लागार कंपनी व जिल्हा नियंत्रण समिती यांनी तात्काळ सादर करणे बंधनकारक राहील.

२०) योजनेची अंमलबजावणी तालुका स्तरावर तालुका कृषि अधिकारी, जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी, विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक आणि राज्यस्तरावर आयुक्त (कृषि) यांचेमार्फत करण्यात येईल.

**योजनेची कार्य पध्दती व संबंधितांची कर्तव्ये आणि जबाबदा-या**

**अ) अर्जदार :-** १) विहित नमुन्यात (क्लेम फॉर्म भाग-१) अर्ज करावा. अर्जासोबत प्रपत्र-ब मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे जोडावीत तसेच अपघाताच्या स्वरुपानुसार अपघाताचे पुराव्यासंबंधी प्रपत्र-ड मध्ये नमूद केलेली कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत.

२) अर्ज क्षेत्रिय कृषि पर्यवेक्षक यांचेमार्फत सादर करुन तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडून रितसर पोहोच घ्यावी.

**ब) महसूल यंत्रणा :-**

**तलाठी :**

अपघातग्रस्त शेतकरी/वारसदार/संबंधित कृषि पर्यवेक्षक यांना ७/१२ चा उतारा, गाव नमुना ६-क व ६-ड आणि विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (क्लेम फॉर्म भाग-२) तातडीने उपलब्ध करुन दयावे.

**तहसिलदार :**

१) योजनेची प्रसिद्धी करण्यास मदत करावी.

२) योजनेसंबंधी माहिती/अर्जाचा नमुना सेतू कार्यालयातून पुरवावा.

३) अर्जदारास लागणारे उतारे, वारसनोंद व तलाठी प्रमाणपत्र अर्जदारास तातडीने उपलब्ध होणेचे दृष्टीने आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

**जिल्हाधिकारी :**

१) जिल्हा नियंत्रण समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या लोकशाही दिनी या योजनेचा तालुकानिहाय आढावा घ्यावा व अडचणीचे निराकरण करावे.

२) महसूल विभागाची कागदपत्रे (७/१२, गाव नमुना ६-क, ६-ड), तलाठी प्रमाणपत्र तसेच विमा प्रस्तावातील विहित कागदपत्रे मिळण्यास अडचणी असल्यास दूर कराव्यात.

३) योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने सुधारणा/सुचना याबाबत आयुक्त (कृषि) यांना अवगत करावे.

**क) कृषि विभाग :-**

**कृषि पर्यवेक्षक :**

१) सदर प्रयोजनार्थ क्षेत्रिय स्तरावरील सर्व कृषि पर्यवेक्षक यांना दावा/प्रस्ताव सादरकर्ता प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) तालुक्यातील मंडळ कृषि अधिकारी यांचे अधिनस्त क्षेत्रिय काम करणारे कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील

**कृ.मा.प.**

दुर्घटनाग्रस्त शेतकरी व मृत शेतकऱ्यांचे वारसदार यांचेशी संपर्क साधावा व त्यांनी स्वतः अर्जाच्या विहित नमुन्यात माहिती शेतकऱ्यांकडून भरुन घेऊन प्रस्ताव तयार करावा.

३) अर्ज स्विकारतेवेळी प्रस्तावासोबत ७/१२, ६-क, ६-ड, प्रतिज्ञापत्र हे मूळ प्रतीत व उर्वरित कागदपत्रे राजपत्रित अधिका-याने साक्षांकित केली असल्याची खात्री करावी व नसल्यास पूर्तता करुन घेऊन अर्ज स्वीकारावा व तालुका कृषि अधिकारी कार्यालयाची रितसर पोहोच अर्जदारास द्यावी.

४) क्षेत्रिय कृषि पर्यवेक्षक यांच्यावर त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रस्ताव/दावे प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी राहील.

५) अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादे कागदपत्राअभावी प्रस्ताव परिपूर्ण होत नसल्यास प्रस्ताव दाखल करुन घेऊन, तालुका कृषि अधिकारी हे संबंधित यंत्रणेचे जबाबदार अधिकारी असल्याने त्यांचेशी संपर्क साधून, कागदपत्राची पूर्तता करुन घेण्यास सहकार्य करावे.

**तालुका कृषि अधिकारी :**

१) योजनेची प्रसिद्धी करण्यास मदत करावी.

२) योजनेसंबंधी माहिती/अर्जाचा नमुना पुरवावा.

३) कृषि पर्यवेक्षकांनी सादर केलेला अर्ज स्विकारावा व अर्ज स्विकारतांना प्रस्तावासोबत ७/१२, ६-क, ६-ड मूळ प्रतीत व उर्वरित कागदपत्रे राजपत्रित अधिका-याने साक्षांकित केलेली असल्याची खात्री करावी, नसल्यास पूर्तता करून घेऊन अर्ज स्विकारावा व पोहोच द्यावी.

४) प्राप्त दावे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयात सादर करुन पोहोच घ्यावी.

५) विहित नमुन्यात (प्रपत्र-इ) प्रकरणांच्या नोंदी ठेवाव्यात.

६) विहित कागदपत्रांचे त्रुटींमुळेपरत आलेल्या प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करुन घेऊन परिपूर्ण प्रस्ताव फेर सादर करावा.

७) विमा प्रस्ताव नामंजूर झाल्यास, विमा सल्लागार कंपनी/विमा कंपनीकडून दावा नामंजुरीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित अर्जदारास पोहोचवावे.

८) दावा नामंजूर संदर्भात विवाद निर्माण झाल्यास जिल्हा नियंत्रण समितीकडे तक्रार दाखल करण्यास संबंधितांना मार्गदर्शन करावे.

९) विमा कंपनीने मंजूर केलेल्या प्रस्तावाचे धनादेश शेतक-यांचे/वारसदारांचे बँकेतील बचत खात्यात तात्काळ जमा करणेबाबत विमा कंपनीकडे पाठपुरावा करावा.

**उपविभागीय कृषि अधिकारी :**

अधिनस्त तालुक्यांतील विमा प्रस्तावांचा आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाही करावी.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :**

१) विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधीस कार्यालयात जागा उपलब्ध करुन द्यावी.

२) योजनेच्या कामासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील एका अधिका-याची किंवा कर्मचा-याची नियुक्ती करावी. सदर अधिकारी किंवा कर्मचारी यांनी विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी समवेत योजनेचे कामकाज करावे.

३) तालुका कृषि अधिका-यांकडून आलेल्या विमा प्रस्तावांच्या नोंदी विहित नमुन्यात (प्रपत्र-फ) ठेवाव्यात.

४) जिल्हा नियंत्रण समितीचे **सदस्य-सचिव** म्हणून दरमहा लोकशाही दिनी आढावा बैठक आयोजित करुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने कार्यवाही करावी.

५) जिल्ह्यात योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

६) विमा सल्लागार कंपनीने अपूर्ण प्रस्तावांची यादी त्रुटीसह जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर केल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडून तात्काळ कागदपत्रांची पूर्तता करुन संबंधित विमा सल्लागार कंपनीचे विभागीय कार्यालयास सादर करणेबाबत संनियंत्रण करावे.

७) विमा कंपनी/विमा सल्लागार कंपनीकडून दावे मंजूरी/नामंजूरीबाबतची प्राप्त माहिती तालुका कृषि अधिकारी यांना द्यावी.

**विभागीय कृषि सहसंचालक :**

१) विभागातील योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.

२) विभागीय कृषि सहसंचालक यांनी योजनेचा जिल्हानिहाय आढावा दरमहा घ्यावा व आयुक्त (कृषि) यांना प्रगती अहवाल सादर करावा.

**कृषि आयुक्तालय :**

१) आयुक्त (कृषि) यांनी विमा सल्लागार कंपनी, विमा कंपनी व विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडून योजनेचा मासिक प्रगती अहवाल घेवून योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी संनियंत्रण करावे व योजनेच्या प्रगतीबाबत शासनास वेळोवेळी अवगत करावे. येणाऱ्या तक्रारींचे जिल्हा नियंत्रण समितीव्दारे निराकरण

**कृ.मा.प.**

करावे.

२) अपूर्ण विमा प्रस्ताव पूर्ण करुन घेऊन विमा प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत यादृष्टीने संनियंत्रण करावे.

**ड) विमा सल्लागार कंपनी :-**

१) विमा सल्लागार कंपनीने कृषि विभागाच्या विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आपले कार्यालय स्थापन करावे तसेच आपल्या अधिनस्त सर्व विभागीय कार्यालयांचे राज्यस्तरावरील समन्वयासाठी, संनियंत्रणासाठी व आयुक्त (कृषि) यांना वेळोवेळी प्रगती अहवाल सादर करण्यासाठी पुणे येथे मुख्यालय स्थापन करावे.

२) विमा सल्लागार कंपनीने त्यांचे विभागीय कार्यालयामधील एका कर्मचा-याची नियुक्ती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयात करावी. सदर कर्मचा-याने विमा प्रस्तावाची तपासणी करावी. विमा प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन घेऊन परिपूर्ण विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करावा आणि अपूर्ण विमा प्रस्तावाबाबतची यादी विमा कंपनीला कळवून विमा दावे मुदतबाह्य होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) विमा सल्लागार कंपनीने विम्याच्या दाव्यांची तपासणी/पडताळणी करावी व परिपूर्ण प्रस्ताव संबंधित विमा कंपनीकडे मंजूरीसाठी सादर करावेत.

४) विमा सल्लागार कंपनीने विमा कंपनी समवेत दरमहा योजनेचा आढावा घ्यावा व मासिक प्रगती अहवाल आयुक्त (कृषि), विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. याबाबतीत सर्व विमा प्रस्तावांची तालुका/जिल्हानिहाय माहिती अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी विमा सल्लागार कंपनीची राहील. यासाठी गरज भासल्यास विमा कंपनी/कंपन्यांस योग्य ती संगणक आज्ञावली तयार करण्यास मदत करावी.

५) विमा प्रस्तावासंदर्भातील मंजूरी वा नामंजूरीबाबतचा प्रगती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना देऊन अर्जदारास स्वतंत्रपणे कळवावे.

६) विमा दावा विवादास्पदरित्या नामंजूर झाला असल्यास अर्जदारास जिल्हा नियंत्रण समितीकडे तक्रार दाखल करण्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे.

७) सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अडचण/संदिग्धता निर्माण झाल्यास विमा सल्लागार कंपनीने ती वेळीच शासनाच्या निदर्शनास आणून देऊन अडचणीचे निराकरण करण्यासाठी शासनाशी/आयुक्त (कृषि) यांचेशी सल्लामसलत करावी.

८) विमा कंपनी विमा योजनेची अंमलबजावणी पॉलिसी कराराप्रमाणे करीत आहे याबाबत विमा सल्लागार कंपनीने दक्षता घ्यावी.

९) विमा योजनेची प्रसिध्दी करण्यास मदत करावी.

१०) योजनेच्या प्रगतीबाबत मासिक आढावा घेऊन योजनेच्या अंमलबजावणीत काही उणीवा आढळल्यास त्या दूर कराव्यात व त्याबाबत शासनास व आयुक्त (कृषि) यांना वेळोवेळी अवगत करावे.

११) वादग्रस्त प्रकरणी विमा कंपनी व शासनाबरोबर समन्वय साधून चर्चेद्वारे वेळोवेळी निराकरण करावे व संबंधितांना विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत करावी.

१२) सदर योजनेमधील यापूर्वीच्या वादग्रस्त प्रकरणांबाबत तसेच विद्यमान योजनेत उद्भवणा-या वादग्रस्त प्रकरणांबाबत शेतक-यांना देय लाभ मिळवून देण्यासंदर्भात विद्यमान विमा सल्लागार कंपनीने शासनास सल्ला द्यावा व शासनाच्यावतीने कायदेशीर कारवाई करावी.

१३) शेतकरी जनता अपघात विमा योजना सन २००९-१० मध्ये राबविण्यासाठी शासनास सल्ला/सहाय्य करण्यासाठी कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा. लि., मुंबई-२१ या इर्डा परवानाधारक विमा सल्लागार कंपनीची विमा सल्लागार म्हणून दिनांक २० ऑगस्ट, २००९ च्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. आयुक्त (कृषि) यांनी विमा सल्लागार कंपनीबरोबर दिनांक २८ ऑगस्ट, २००९ रोजी केलेल्या करारानुसार विमा सल्लागार कंपनीने परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेल्या विभागीय कार्यालयांद्वारे शासनास विनामोबदला सहाय्य करावे.

**इ) विमा कंपनी :-**

१) त्रिपक्षीय करार केल्यानंतर विमा कंपनीने विमा पॉलीसी तात्काळ निर्गमित करावी.

२) विमा सल्लागार कंपनीने सादर केलेला विमा प्रस्ताव तपासून परिपूर्ण प्रस्ताव स्विकारुन पोहोच द्यावी. त्यावर एक महिन्यात निर्णय घेऊन विमा रकमेचा धनादेश शेतक-यांच्या/वारसदारांच्या बचत खात्यात जमा करावा.

३) विमा प्रस्तावात त्रुटी असल्यास त्रुटीबाबतचे पत्र किंवा दावा नामंजूर असल्यास त्याबाबतचे पत्र संबंधित अर्जदारास पोहोच करावे व त्याची प्रत विमा सल्लागार कंपनी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना द्यावी. परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत उचित कार्यवाही न केल्यास तीन महिन्यापर्यन्त दावा रकमेवर दरमहा ९ टक्के व त्यानंतर पुढे १५ टक्के व्याज देय राहील.

४) शेतकऱ्यांचा विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह विमा योजनेच्या कालावधीत कधीही प्राप्त झाला तरी तो विचारात घेणे विमा कंपनीला बंधनकारक राहील. अखेरच्या दिवसात झालेल्या अपघातासाठी योजनेचा कालावधी संपल्यापासून ९० दिवसांपर्यत विमा प्रस्ताव स्विकारावेत. समर्थनीय कारणास्तव ९० दिवसानंतर प्राप्त दावे स्विकारावेत. तथापि अपघाताचे सूचनापत्र विमा कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांपर्यत घेणे बंधनकारक राहील व त्यानुसार सविस्तर प्रस्तावांवर कार्यवाही करणे कंपनीस बंधनकारक राहील.

५) प्रपत्र-ड मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारेच विम्याची रक्कम अदा करावी. दुर्घटना सिध्द होत असेल व अपवादात्मक परिस्थितीत एकाद्या कागदात्राची पूर्तता होवू शकत नसेल तर पर्यायी दाखल्याबाबत आयुक्त (कृषि)/जिल्हाधिकारी यांचेशी विचार-विनिमय करुन पूर्तता करुन घेऊन विम्याची रक्कम अदा करावी.

६) अपघातग्रत वाहन चालकाचे चुकीमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास/अपंगत्व आल्यास, दोषी वाहन चालक वगळता, सर्व अपघातग्रत शेतकऱ्यांचे, केवळ अपघात झाला या कारणास्तव, विम्याचे दावे मंजूर करावेत.

**कृ.मा.प.**

७) अपघाती मृत्यू संदर्भात दुर्घटना घडल्याचे सिध्द झाल्यास अनावश्यक धोका पत्करला या कारणास्तव एकही प्रकरण नाकारता येणार नाही.

८) अपघातामध्ये शेतकऱ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबियास दाव्याची रक्कम पुढील प्राथम्यक्रमानुसार अदा करावी -

**१)** मृत शेतकऱ्यांची पत्नी **२)** मृत शेतकऱ्यांची अविवाहित मुलगी **३)** मृत शेतकऱ्यांची आई **४)** मृत शेतकऱ्यांचे मुलगे **५)** मृत शेतकऱ्यांची नातवंडे **६)** मृत शेतकऱ्यांची विवाहित मुलगी

२१) जर शेतक-याचा मृत्यु वाहन अपघातामुळे झाला असेल व अपघातग्रस्त शेतकरी स्वतः वाहन चालवित असेल तर अशा प्रकरणी वैध वाहन चालविण्याचा परवाना सादर करणे आवश्यक राहील.

२२) हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२००९१२०४१८०९०३००१** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने**

**(ब. दि. उमाटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.मंत्री, कृषि व जलसंधारण यांचे खाजगी सचिव
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
७) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, (अ.व सु.) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सर्व विभागीय महसूल आयुक्त
१३) सचिव, कृषि मंत्रालय, भारत सरकार,(कृषि व सहकार विभाग) कृषि भवन, नवी दिल्ली.
१४) सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार, (वित्त विभाग) (विमा), नवी दिल्ली
१५) आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) अध्यक्ष, कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा. लि., मित्तल टॉवर्स, ११८ बी विंग, ११ वा मजला, नरीमन पॉईट, मुंबई-४०० ०२१.
१७) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., प्रादेशिक कार्यालय, अंबिका भवन, क्र.१९, ३ रा मजला, धरमपेठ एक्सटेंशन, शंकर नगर चौक, नागपूर-४४० ०१०

१८) व्यवस्थापक, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि., नागपूर प्रादेशिक कार्यालय, शुक्ला भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर-४४० ०१०.

१९) फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., ००१, ट्रेड प्लाझा, ४१४, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

२०) महालेखापाल महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर

२१) संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई

२२) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई

२३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

२४) विमा संचालक, म्हाडा इमारत, १ला मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई

२५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

२६) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

२७) सर्व जिल्हाधिकारी

२८) सर्व तहसिलदार

२९) सर्व विभागीय कृषि सह संचालक, महाराष्ट्र राज्य

३०) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

३१) सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद

३२) सर्व तालुका कृषि अधिकारी

३३) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

३४) सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई

३५) निवड नस्ती, का-११-अे

## प्रपत्र-अ

## शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत मिळणारे लाभ

| | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १. | अपघाती मृत्यू | रुपये १,००,०००/- |
| २ | अपघातामुळे २ डोळे निकामी होणे | रुपये १,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे २ अवयव निकामी होणे | रुपये १,००,०००/- |
| ४ | अपघातामुळे १ डोळा व १ अवयव निकामी होणे | रुपये १,००,०००/- |
| ५ | अपघातामुळे १ डोळा निकामी होणे | रुपये ५०,०००/- |
| ६ | अपघातामुळे १ अवयव निकामी होणे | रुपये ५०,०००/- |

## प्रपत्र-ब

## लाभार्थी पात्रतेच्या अटी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे

१. महाराष्ट्र राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदीनुसार असलेला खातेदार शेतकरी

२. शेतकरी म्हणून त्याचे नावाचा समावेश असलेला ७/१२ उतारा

३. ज्या नोंदीवरुन अपघातग्रस्त शेतक-याचे नांव ७/१२ वर आले असेल अशी संबंधित फेरफार नोंद (गाव नमुना नंबर ६-ड)

४. शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठयाकडील गांव नमुना नं.६-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद

५. विहीत नमुन्यातील कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग)

६. शेतकऱ्यांच्या वयाच्या पडताळणीकरिता जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा मूळ दाखला किंवा राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेले ग्रामपंचायत प्रमाणपत्र किंवा शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र/ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र या पैकी कोणतेही एक प्रमाणपत्र किंवा उपलब्ध नसल्यास निवडणूक ओळखपत्र

**सुचना :** अ.क्र. १ ते ५ हे मूळ कागदपत्र आवश्यक व क्रमांक ६ मधील कागदपत्र मूळ किंवा राजपत्रित अधिका-याने साक्षांकित केलेले असल्यास ग्राहय धरण्यात येईल.

## प्रपत्र-क

## विमा संरक्षणामध्ये समाविष्ठ नसणाऱ्या बाबी

१) विमा कालावधी पूर्वीचे अपंगत्व २) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे ३) गुन्हयाच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात ४) अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात ५) नैसर्गिक मृत्यू ६) भ्रमिष्टपणा ७) बाळंतपणातील मृत्यू ८) शरीरांतर्गत रक्तस्त्राव ९) मोटार शर्यतीतील अपघात १०) युध्द ११) सैन्यातील नोकरी १२) जवळच्या लाभधारकाकडून झालेला खून

**कृ.मा.प.**

**प्रपत्र-ड**

**शेतकरी जनता अपघात विमा योजना - अपघाताचे पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे**

| अ.नं. | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | रस्ता / रेल्वे अपघात | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला |
| २ | पाण्यामध्ये बुडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला (बुडून बेपत्ता झाल्यास फक्त प्रथम माहिती अहवाल आवश्यक तथापि क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक ) |
| ३ | जंतूनाशक अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल, मृत्यू दाखला |
| ४ | विजेचा धक्का अपघात | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला |
| ५ | वीज पडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला |
| ६ | खून | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल, दोषारोप पत्र, मृत्यू दाखला |
| ७ | उंचावरुन पडून झालेला मृत्यू | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ ंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, पोलीस अंतिम अहवाल, मृत्यू दाखला |
| ८ | सर्पदंश/विंचू दंश | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल, मृत्यू दाखला (वैद्यकीय उपचारापूर्वीच निधन झाल्याने पोस्ट मॉर्टेम झाले नसल्यास या अहवालातून सूट मात्र वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र शासकीय आरोग्य केंद्र अधिका-याकडून प्रतिस्वाक्षरीत असणे आवश्यक ) |
| ९ | नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला, नक्षलवादी हत्येसंदर्भातील कार्यालयीन कागदपत्र |
| १० | जनावरांच्या हल्यामुळे/चावण्यामुळे जखमी/मृत्यू | |
| | अ) जनावरांच्या चावण्यामुळे रेबीज होवून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल, औषधोपचाराची कागदपत्रे, मृत्यू दाखला |
| | ब) जखमी होवून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला |
| | क) जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू होवून शव न मिळणे | प्रथम माहिती अहवाल, क्षतिपूर्ती बंधपत्र आवश्यक |
| ११ | दंगल | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला, दंगलीबाबतची कार्यालयीन कागदपत्रे |
| १२ | अन्य कोणतेही अपघात | प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, मृत्यू दाखला |
| १३ | अपंगत्वाच्या लाभाच्या पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | १) प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याचे कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र अथवा दवाखान्याच्या नोंदी<br>२) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र |

**प्रपत्र "ड" मधील कागदपत्रे मूळ स्वरूपात सादर केली असतील किंवा राजपत्रित अधिका-यांनी साक्षांकित केलेली असतील तरी ग्राहय धरण्यात येतील.**

**प्रपत्र इ**

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

विहित नमुन्यात प्रकरणांच्या नोंदी ठेवणे (तालुकास्तर)  सन २००९-१०

| अ.क्र. | अपघातग्रस्त शेतक-याचे नांव व पत्ता | अपघाताचे स्वरुप | अपघाताचा दिनांक | विमा प्रस्ताव प्राप्त दिनांक | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात पाठविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**प्रपत्र फ**

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

विहित नमुन्यात प्रकरणांच्या नोंदी ठेवणे (जिल्हास्तर)  सन २००९-१०

| अ.क्र. | अपघातग्रस्त शेतक-याचे नांव व पत्ता | अपघाताचे स्वरुप | अपघाताचा दिनांक | तालुका कृषि अधिकारी यांचेकडुन विमा प्रस्ताव प्राप्त दिनांक | विमा सल्लागार कंपनीकडे पाठविल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**कृ.मा.प.**

**प्रपत्र-ग**

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

**प्रतिज्ञापत्र** (रु. २० चे स्टँप पेपर वरील)

मा.कार्यकारी दंडाधिकरी, यांचे समोर

मी खाली सही करणार ----------------------------------------रा.------------------तालुका ----------
जिल्हा ----------------सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, खालील लिहिलेला मजकूर माझे सद्सदविवेक बुध्दीस स्मरुन लिहिलेला असून खरा आहे.

श्री.------------------------------------ हे दिनांक / / २००९ रोजी गांव ----------------------
ता. -----------------जि. -------------- येथे अपघाताने अपंग/मयत झाले आहेत. त्यांना शेतकरी जनता अपघात विमा योजनेचा लाभ मिळावा म्हणून मी अर्ज केलेला आहे. त्यासाठी क्लेम फॉर्म (भाग-१) मी भरला असून त्यातील तपशिल खरा आहे. सदर क्लेम फॉर्म (भाग-१) च्या अनुषंगाने सादर केलेली महसूल व इतर सर्व कागदपत्रे खरी आहेत व त्यातील माहितीही खरी आहे. मृत व्यक्ती शेतकरी आहे. क्लेम फॉर्म (भाग-१) सोबत जोडलेली मूळ कागदपत्रे व साक्षांकित कागदपत्रे खरी असून त्यात मी कोणतीही खाडाखोड केलेली नाही अथवा बदल केलेला नाही.

वरील प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो असत्य नाही. तो असत्य निघालेस होणा-या कारवाईस मी पात्र राहीन तसेच भा.दं.वि. संहिता १९१, १९२ , १९६, १९७, १९८, १९९, व २०० नुसार दंडास व कारवाईस पात्र राहीन हे लिहून दिले असे.

ओळख प्रतिज्ञापत्र करणार

(नाव :- )

अपघातग्रस्त व्यक्तीशी नाते

**<u>हस्ते बटवडा</u>**

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**
**क्लेम फॉर्म भाग-१**

प्रति,
संबंधित विमा कंपनी
द्वारा तालुका कृषि अधिकारी, तालुका ------------------ जिल्हा ---------------------

महोदय,

१) अर्जदार नाव व पत्ता ---------------------------------------------
---------------------------------------------
-------- -------------------------------------

२) अर्जदाराचे अपघातग्रस्ताशी नाते
(मोबाईल क्र./दूरध्वनी क्र.) -------- --------------------------------------

३) अपघातग्रस्ताचे नांव व पत्ता -------- --------------------------------------
----------------------------------------------
----------------------------------------------

४) अपघात दिनांक -------- --------------------------------------

५) अपघाताचे स्वरुप -------- --------------------------------------

६) कोणत्याही एका शेतजमिनीचा धारण केलेला तपशिल
सर्व्हे नं. / गट नं. ---------------------
गावाचे नांव ---------------------------

७) बँकेचा तपशिल
१) अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे नांव -----------------------------------------
२) बचत खाते क्र. -------- ----------------------------------
३) शाखा व शाखा क्र. -------- ----------------------------------

मी खालील सही करणारा अर्जदार नमूद करतो की, उपरोक्त माहिती खरी असून उपरोक्त अपघातग्रस्त शेतकरी/वारसदार म्हणून रु.१,००,०००/- , रु.५०,०००/- एवढया शेतकरी जनता अपघात विमा योजनेखालील रकमेच्या दाव्यासाठी अर्ज करीत आहे/आहोत. कृपया सदर दावा निकाली काढून दाव्याची रक्कम उपरोक्त नमूद बँक खात्यात जमा करण्यात यावी ही विनंती.

सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करीत आहे.

( अर्जदाराची सही )

**कृ.मा.प.**

## क्लेम फॉर्म भाग-१ चे सहपत्र

| अ. क्र | तपशिल | जोडलेली कागदपत्रे | तालुका कृषि अधिकारी यांचा शेरा |
|---|---|---|---|
| १ | ७/१२ उतारा (मूळ प्रत) | | |
| २ | गाव नमुना नं. ६-ड, (ज्या फेरफार नोंदीद्वारे ७/१२ वर नाव आले.) (मूळ प्रत) | | |
| ३ | गाव नमुना नं. ६-क (मूळ प्रत) | | |
| ४ | तलाठी प्रमाणपत्र (मूळ प्रत) | | |
| ५ | प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग) (मूळ प्रत) | | |
| ६ | वयाचा पुरावा (साक्षांकित प्रत) | | |
| ७ | मृत्यु दाखला / अपंगत्वाचा दाखला (साक्षांकित प्रत) | | |
| ८ | प्रथम माहिती अहवाल (साक्षांकित प्रत) | | |
| ९ | घटनास्थळ पंचनामा (साक्षांकित प्रत) | | |
| १० | अपघाताचे स्वरुपानुसार प्रपत्र-ड मधील इतर कागदपत्रे (साक्षांकित प्रत) | | |
| | १ | | |
| | २ | | |
| | ३ | | |
| | ४ | | |
| | ५ | | |
| | ६ | | |

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

**क्लेम फॉर्म भाग-२**

तलाठयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की श्री./श्रीमती -------------------------------------------- मौजे --------------------- तालुका ------------------- जिल्हा ---------------------- हे/ह्या शेतकरी जनता अपघात विमा योजने अंतर्गत समाविष्ट असून अपघातामुळे ते/त्याचे वारस रु. १,००,०००/- किंवा रु. ५०,०००/- एवढया रकमेच्या दाव्यास पात्र आहेत.

श्री./ श्रीमती ----------------------------------------- यांचे नांवे वहिताखालील एकूण------- एवढी एकर जमीन असून ते-----------------------या गावाचे खातेदार आहेत. त्यांचा ७/१२ , ६-क व ६-ड (फेरफार) खातेउतारा सोबत जोडलेला आहे. त्यांचे कायदेशीर वारस पुढील प्रमाणे आहेत.

| | नांव | नाते |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

स्थळ -

दिनांक - ( )

तलाठी

**कृ.मा.प.**

<u>हस्ते बटवडा</u>

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

**क्लेम फॉर्म भाग-३**

तालुका कृषि अधिका-याचे पत्र

जा.क्र. ----------------------------

दिनांक ----------------------------

प्रति,

मे.कबाल इन्शुरन्स ब्रोकींग सर्विसेस प्रा.लि.,

---------------- जिल्हा प्रतिनिधी

**<u>विषय</u> :** शेतकरी जनता अपघात विमा योजना

महोदय,

श्री.--------------------------------- रा. ----------------- ता.----------------- जि. --------------- यांचा क्लेम फॉर्म भाग-१ मधील अर्ज सोबत जोडला आहे. सविस्तर तपशिल अर्जात नमूद आहे. अर्जासोबतची साक्षांकित कागदपत्रे स्विकारताना मूळ कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयाने केली आहे. सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत.

(जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत रवाना)

सोबत- मूळ दावा अर्ज

तलाठयाचे प्रमाणपत्र

अपघाताचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे

(क्लेम फॉर्म-३ व ४ चे सहपत्रात उल्लेखीत)

तालुका कृषि अधिकारी

ता.-----------------जि.-----------------

<u>**हस्ते बटवडा**</u>

**शेतकरी जनता अपघात विमा योजना**

**क्लेम फॉर्म भाग-४**

क्रमांक :-------------------------------

दिनांक :------------------------------

**प्रति**

संबंधित विमा कंपनी

पत्ता -------------

**विषय :-** शेतकरी जनता अपघात विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याबाबत

महोदय

श्री.----------------------------------- रा.------------------- ता.-----------------
जि.----------------- यांचा भाग-१ मधील अर्ज सोबत जोडला आहे. सविस्तर तपशिल अर्जात नमूद आहे. अर्जासोबतची साक्षांकित कागदपत्रे स्विकारताना मूळ कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयाने केली आहे. सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत.

( )

कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्विसेस प्र.लि.

जिल्हा कार्यालय पत्ता --------------------

1**सोबत**

१) मूळ दावा अर्ज

२) तलाठयाचे प्रमाणपत्र

३) ७/१२, ६-ड (फेरफार) व ६-क चा उतारा

४) तालुका कृषि अधिका-याचे प्रमाणपत्र

५) अपघाताच्या अनुषंगाने इतर आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे.
(क्लेम फॉर्म भाग-३ व ४ चे सहपत्रात उल्लेखित)

**कृ.मा.प.**

## शेतकरी जनता अपघात विमा योजना

## क्लेम फॉर्म भाग-३ व ४ चे सहपत्र

| अ. क्र. | तपशिल | तपासणी अधिका-याचा अहवाल | | |
|---|---|---|---|---|
| | | तालुका कृषि अधिकारी | विमा सल्लागार प्रतिनिधी | विमा कंपनी |
| १ | ७/१२ उतारा (मूळ प्रत) | | | |
| २ | गाव नमुना नं. ६-ड,(ज्या फेरफार नोंदीद्वारे ७/१२ वर नाव आले.) (मूळ प्रत) | | | |
| ३ | गाव नमुना नं. ६-क (मूळ प्रत) | | | |
| ४ | तलाठी प्रमाणपत्र (मूळ प्रत) | | | |
| ५ | प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग) (मूळ प्रत) | | | |
| ६ | वयाचा पुरावा (साक्षांकित प्रत) | | | |
| ७ | मृत्यु दाखला/अपंगत्वाचा दाखला (साक्षांकित प्रत) | | | |
| ८ | प्रथम माहिती अहवाल (साक्षांकित प्रत) | | | |
| ९ | घटनास्थळ पंचनामा (साक्षांकित प्रत) | | | |
| १० | अपघाताचे स्वरुपानुसार प्रपत्र-ड मधील इतर कागदपत्रे (साक्षांकित प्रत) | | | |
| | १ | | | |
| | २ | | | |
| | ३ | | | |
| | ४ | | | |
| | ५ | | | |
| | ६ | | | |

## परिशिष्ट - १

### कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा. लि. या सल्लागार कंपनीची विभागीय कार्यालये

| | | |
|---|---|---|
| १ | **मुंबई** | |
| | कुमारी सुषमा साळुंके | फोन - ०२२ - ६६३२४९१८ / १९ |
| | ११८ बी, मित्तल टॉवर, नरीमन पॉईट, | ४०७८१२३४ |
| | मुंबई-४०० ०२१ | फॅक्स ०२२ - ६६३२४९२० |
| २ | **ठाणे** | |
| | मनिषा फासे | फोन - ०२२- २५८८४४७२ |
| | कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा.लि., | फॅक्स- ०२२- २५८८६३२८ |
| | एशियाटीक आर्केड, गाळा नं. ५०, | |
| | पोखरण रोड नं.१, | |
| | वर्तक नगर, ठाणे (वेस्ट)-४०० ६०६ | |
| ३ | **नाशिक** | |
| | श्री. नंदकुमार देशपांडे | फोन - ९८६०९५४१५१ |
| | कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा.लि., | फॅक्स ०२५३- २३१३२५७ |
| | ४ / ए, देह मंदीर को. ऑप. हौ. सो., | |
| | श्रीरंगनगर, नाशिक-४२२ ००२ | |
| ४ | **पुणे** | |
| | श्री. सी. जी. तिनईकर | फोन - ०२० - २५५२१४१२ |
| | करंदीकर हाउस, ३ रा मजला, | फॅक्स - ०२० - २५५२१४१३ |
| | १०१, शिवाजीनगर, | |
| | पुणे-४११ ००५ | |
| ५ | **औरंगाबाद** | |
| | विनित आठल्ये | फोन - ०२४० - ६५१३५७७ |
| | प्लॉट नं. ७, भास्करायण, | फॅक्स- ०२४० - ५६१३५७७ |
| | इ-१ सेक्टर, एचडीएफसी एलआयसी | |
| | ऑफिसचे खाली टाउन सेंटर,सिडको, | |
| | औरंगाबाद-४३१ ००३ | |
| ६ | **अमरावती** | |
| | श्री. सुभाष आग्रे | फोन - ०७२१ - २५९११८० |
| | सिंधुदुर्ग अपार्टमेंट, जोगळेकर प्लॉट , | |
| | रुक्मीणी नगर जवळ, जगताप पेट्रोल पंपामागे, | |
| | अमरावती-४४४ ६०१ | |
| ७ | **नागपूर** | |
| | श्री. संदीप खैरनार | फोन - ०७१२ - ६४५११४७ |
| | कबाल इन्शुरन्स ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा.लि., | फॅक्स - ०७१२ - २२४७५८७ |
| | प्लॉट नं.११, लाभेश्वर हाऊस, डागा ले आऊट, | |
| | नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर-४४० ०१० | |